अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित नसलेल्या तथापि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अखत्यारित असलेल्या शासन मान्य विविध संस्थांचे (NON-AICTE) अभ्यासक्रम बंद करून अनामत रक्कम परत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः मान्यता -२०१७/१८६/१७/तांशि-५,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०७ मार्च, २०१८.

वाचा:-

१) **महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे क्र.जा क्र.मरातंशिमं/का-५० /अभ्यासक्रम विकास /२०१६/४०२३/दिनांक :१/०७/२०१६.**

२) **महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे क्र.जा क्र.मरातंशिमं/का-५० /अभ्यासक्रम विकास /२०१७/१२३२/दिनांक :१३/०२/२०१७.**

प्रस्तावना:-

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित नसलेल्या तथापि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अखत्यारित असलेल्या शासन मान्य विविध संस्थांमध्ये (NON-AICTE) अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. तथापी सदर संस्थां मार्फत राबविले जात असलेले (NON-AICTE) अभ्यासक्रम बंद करून संस्थांनी जमा केलेली नियत ठेव संस्थेच्या खाती वर्ग करण्याची विनंती संस्थांनी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना केली आहे. त्यास अनुसरून मंडळाने सदर संस्थांमार्फत चालवले जात असलेले (NON-AICTE) अभ्यासक्रम बंद करून संस्थांनी जमा केलेली नियत ठेव संस्थेच्या खाती वर्ग करण्यास उपरोक्त पत्रान्वये प्रस्तावित केले आहे.

शासन निर्णय:-

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित नसलेल्या तथापी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अखत्यारित असलेल्या खालील तक्त्यातील संस्थांचे अभ्यासक्रम बंद करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहुन शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	संस्थेचे नाव	अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता
१	जे.पी.कॉम्पूटर अकॅडमी, सातारा (संस्था क्रमांक ५३४), ७६० शनिवार पेठ, सातारा	Advance Diploma in Computer Software & System Analysis & Application (ADCSSAA)	६०
२	मराठवाडा मित्र मंडळ स्कूल ऑफ इंटिरीअर डिझाईन, ३०२/अ, डेक्कन जिमखाना, पुणे-४११००४ (संस्था क्र.०४२७)	Diploma in Fashion and Textile Designing,	४०
		Post Diploma in Landscape Architecture	२०
		Certificate Course in ३ D Animation and Graphics	४०
३	ज्ञानसागर शिक्षण व बहुउद्देशीय संस्था र.नं.महा.२९८/०६ अमरावती, वरुड (संस्था क्र.०९६३)	Diploma in Beauty Culture & Hair Dressing	६०
४	महाराष्ट्र ॲकेडमी ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड एज्युकेशनल रिसर्च, श्री सावित्रीबाई फुले पॉलिटेक्निक, पुणे	Diploma in Meritime Catering & Hotel Management	६०
		Advanced Diploma in Call Centre Management	६०
५	दि फ्रेंडस ऑफ दि डिप्रेस्ड ली, शेवगाव, कार्यालय, आबासाहेब काकडे विद्यालय परिसर, शेवगाव ता. शेवगाव, जि.-अ.नगर-४१४५०२	Advance diploma in Computer Software, System Analysis and Application (ADCSSAA)	६०

१) या संस्थेतील बंद करावयाच्या अभ्यासक्रमांच्या संबंधित सर्व दस्तऐवज जसे की गुणपत्रिका, उत्तरपत्रिका, निकालपत्रे, विद्यार्थ्यांचे पत्ते, फीच्या पावत्या इत्यादी बाबी संस्थेने मंडळाकडे सूपूर्द करणे आवश्यक राहील.

२) संबंधित अभ्यासक्रमासाठी नियुक्त शिक्षक वर्ग/कर्मचारी यांच्या सेवाविषयक व इतर बाबतीत न्यायप्रविष्ठ असलेली सर्व प्रकरणांची जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील. भविष्यकाळात कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भ्वल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

३) संस्थेकडून शासनाची वसुली अद्यापी थकबाकी असल्यास त्याचा भरणा करणे संस्था प्रमुखांवर बंधनकारक राहील.

४) संस्थेमध्ये सदर अभ्यासक्रम राबविण्यासाठी आवश्यक स्थावर जंगम मालमत्तेविषयी या संस्थेने शासनाकडून किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतलेले असल्याचे यापुढे निदर्शनास आल्यास त्याची परतफेड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

५) संस्थेतील संबंधित अभ्यासक्रम बंद केल्यानंतर त्या संस्थेतील प्रवेशीत विद्यार्थ्यांना व माजी विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्याची इच्छा असल्यास त्याची पर्यायी व्यवस्था करणे संस्थांवर बंधनकारक राहील.

६) संबंधित अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या संस्थेतील शिक्षक व कर्मचारी यांना देय असलेले वेतन, वेतन भरपाई व अन्य आर्थिक प्रदानाचे भुगतान करणे संस्थेस बंधनकारक राहील.

७) संबंधित संस्थांनी उपरोक्त अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनाकडे जमा केलेली नियत ठेव संस्थांच्या खाती वर्ग करण्याची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०७१११८२५३९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2018.03.07 11:19:34 +05'30'

(अ.र.काटकर)

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, ३,महापालिका मार्ग,पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१,

२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, ४९,खेरवाडी,वांद्रे (पुर्व) मुंबई-४०००५१,

३) संबंधित संस्था (महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेमार्फत),

४) निवड नस्ती/तांशि-५.